# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-९३ दिनांक - १४/०३/२०२४

## ऑनलाईन फसवणूक झालेली रक्कम रुपये ५०,०००/- परत करण्यात सायबर पोलीस ठाणेस यश !!

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमिरा परिसरातील श्रीमती. बहार यांनी ऑनलाईन बुक मागविले होते. त्यासंदर्भात कुरीयर सर्विस मधून बोलत असल्याचे भासवून त्यांची वैयक्तीक माहिती घेवून अनोळखी लिंक पाठवून त्याद्वारे ५०,०००/- रुपयाची फसवणूक झालेबाबत तक्रार सायबर पोलीस ठाणे येथे तक्रार प्राप्त होती.

**( सायबर पोलीस ठाणे आवक अर्ज क्रमांक २२१०-बी/२०२३ दिनांक १८/०९/२०२३ )**

नमूद तक्रारीबाबत तात्काळ दखल घेवून तक्रारदार यांचे झाले व्यवहाराबाबत माहिती प्राप्त करण्यात आली. सदरचे सर्व व्यवहार एअरटेल पेमेंट बँकेच्या खात्यावर गेल्याचे दिसून आले. तक्रारदार यांची फसवणूक झालेल्या रकमेबाबत **Airtel Payments Bank** यांचेसोबत तात्काळ पत्रव्यवहार करुन फसवणुक झालेली रक्कम थांबविण्यात आली. सदर तक्रारीचे अनुषंगाने **Airtel Payments Bank** यांचेसोबत सातत्यपुर्ण पाठपुरावा करून नमूद फसवणूक झालेली रक्कम तक्रारदार यांचे मुळ खात्यावर परत मिळविण्यात आली.

### अशा प्रकारची फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी...

- **Online फसवणूकीसंदर्भातील कोणतेही एसएमएस, लिंकबाबत कोणत्याही प्रकारे सहभागी होवू नये.**
- **आपले बँक खाते, जन्मदिनांक, OTP वा इतर वैयक्तीक माहीती देवू नये.**
- **अनोळखी लिंक, ॲप्लीकेशन डाऊनलोड करु नये.**
- **ऑनलाईन फसवणूक झाल्यास तात्काळ बँकेला संपर्क करावा.**

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे फसवणूक करणे कायदयाने गुन्हा आहे. असा प्रकार आपल्यासोबत घडला असल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.**

सदरची कामगिरी श्री.अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, सपोनि/स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, पोअं/१२०९२ प्रविण आव्हाड, पोअं/१२०९५ गणेश इलग, मपोअं/१३१०४ पल्लवी निकम, पोअं/२२०४०प्रशांत बोरकर, मसुब/सोनाली मोरे, मसुब/प्रविण सावंत यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक :- १९३०

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट :- www.cybercrime.gov.in

----0000----